आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२७ एप्रिल २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत आणि न्यूझीलंडमध्ये आज मुक्त व्यापार करार, दोन्ही देशातला व्यापार दुप्पट करण्याचं लक्ष्य

- रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा बोलण्याची सक्ती करण्याच्या निर्णयाला मुदतवाढ देण्याची सरकारची तयारी

- गेल्या आर्थिक वर्षात मेळघाटात ९२ मुले आणि ५ मातांचा मृत्यू

**आणि**

- राज्यात काही ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ, येत्या दोन दिवसात विदर्भात उष्णतेची लाट येण्याची शक्यता

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंडमधल्या मुक्त व्यापार करारावर आज नवी दिल्लीत स्वाक्षरी झाली. केंद्रीय उद्योग आणि वाणिज्य मंत्री पीयूष गोयल आणि न्यूझीलंडचे व्यापार आणि गुंतवणूक मंत्री टोड मॅकले यांच्या अध्यक्षतेखाली हा करार झाला. यामुळे येत्या ५ वर्षात दोन्ही देशातला व्यापार दुप्पट होऊन ५ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचण्याची आशा आहे. न्यूझीलंडच्या संसदेची मंजुरी मिळाल्यानंतर वर्षाअखेर या कराराची अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे. या कराराविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड - व्हाइस कास्ट (१.४२ सेकंद)**

*(गेल्यावर्षी डिसेंबरमध्ये भारत - न्यूझीलंड व्यापार कराराच्या वाटाघाटी पूर्ण झाल्या होत्या. या कराराच्या अंतर्गत विविध क्षेत्रातल्या भारतीय वस्तूंवर न्यूझीलंड कुठलाही कर लावणार नाही. यापूर्वी हे दर १० टक्क्यांपर्यंत होते. कम्प्युटर आधारित सेवा, दृकश्राव्य माध्यम, दूरसंचार, बांधकाम, शिक्षण, पर्यावरण, वित्त, पर्यटन यासारख्या उद्योगांमध्ये भारतीय कंपन्यांना प्रवेश मिळणार आहे. या करारां◌ंअंतर्गत ५ हजार भारतीयांना न्यूझीलंडमध्ये रोजगारासाठी तात्पुरता विसा मिळेल आणि ३ वर्षांसाठी राहता येईल. न्यूझीलंडमधून येणाऱ्या ७० टक्के वस्तूंवरच्या करांचं सुसुत्रीकरण भारतानं केलं आहे. पेट्रोलियम पदार्थ, वनस्पती तेल, वाईन, इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल वस्तूंवर भारत काही वर्षांसाठी कर कमी करणार आहे. सफरचंद, किवी*

*यासारख्या गोष्टींची मर्यादित आयात भारत करणार आहे. कृषी, दुग्धजन्य पदार्थ, दागदागिने उद्योग या कराराच्या कक्षेबाहेर राहणार आहे. न्यूझीलंड या कराराच्या अंतर्गत भारतात २० अब्ज डॉलरची गुंतवणूक करणार आहे.*

*या करारामुळं शेतकरी, नवउद्योजक, विद्यार्थी, महिला आणि संशोधकांसाठी नवीन संधी निर्माण होतील, असं पीयूष गोयल म्हणाले. गेल्या साडे ३ वर्षात भारतानं ७ मुक्त व्यापार करार केले असून अमेरिका आणि युरोपियन महासंघासोबतच्या करारावर लवकरच स्वाक्षरी होईल, असं त्यांनी सांगितलं.*

*अनेक शतकांमध्ये होणारा दुर्मिळ असा हा करार असल्याची प्रतिक्रिया न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झॉन यांनी दिली आहे. यामुळे दोन्ही देशांना फायदा होईल आणि न्यूझीलंडला अधिकाधिक देशांमध्ये निर्यातीच्या संधी खुल्या होतील, असं लक्झॉन यांनी सांगितलं.*

*प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या कराराचं स्वागत केलं आहे. शेतकरी, युवा, महिला, MSME, विद्यार्थी, नवउद्योजक यासह इतर क्षेत्रातल्या भारतीयांना या कराराचा लाभ होईल, असं ते म्हणाले. )*

**<><><><><>**

राज्यातल्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा बोलणं सक्ती करण्याचा निर्णय पुढं ढकलला असून मुदतवाढीबाबतचा निर्णय उद्या घेतला जाईल, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज केली. ते आज मुंबईत आज टॅक्सी-रिक्षा चालकांच्या विविध संघटनांसोबत बैठक झाल्यानंतर बातमीदारांशी बोलत होते.

या बैठकीत सर्व संघटनांसोबत सकारात्मक चर्चा झाली. मराठीतून बोलण्याला कुणाचीही हरकत नाही असं सर्व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितलं. मात्र त्यांना काही दिवसांची मुदत हवी आहे, सर्व रिक्षा-टॅक्सी चालकांचे मराठी शिकवणी वर्ग घेतले जातील असं पदाधिकाऱ्यांनी मान्य केल्याचं सरनाईक यांनी सांगितलं. कुणाचाही रोजगार बुडणार नाही याची काळजी सरकार घेईल अशी हमी सरनाईक यांनी दिली.

**- - होल्ड बाईट सरनाईक - -**

सरकार आजही मराठी सक्तीच्या निर्णयावर ठाम असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं तसंच महाराष्ट्रात काम करायचं असेल तर मराठी यायलाच हवी याचा पुनरूच्चार सरनाईक यांनी केला.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकांच्या दुसऱ्या आणि अंतिम फेरीतला प्रचार आज संपला. मतदारांपर्यंत पोचण्यासाठी विविध पक्षातल्या नेत्यांच्या प्रचारसभा झाल्या.

प्रधानमंत्री आणि वरिष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी यांनी उत्तर २४ परगणात कांकीनारा इथं एका रॅलीला संबोधित केलं. अमित शहा यांनी हुगळी जिल्ह्यात चंदननगर इथं एक रोड शो केला.

तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी यांनी  कोलकाता इथं रोड शो केला. तृणमूलचे सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांनी अरामबाग तसंच हुगळी इथं रॅलीला संबोधित केलं तसंच नंतर महेशताळा इथं रोड शोमध्ये भाग घेतला. दुसऱ्या फेरीत, २९ तारखेला पश्चिम बंगालच्या सात जिल्ह्यातल्या १४२ मतदारसंघातले मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

**<><><><><>**

बोगस बियाणं ओळखण्यासाठी बियाण्यांची डीएनए फिंगर प्रिंट टेस्ट केली जाणार असून बियाणं उत्पादक कंपन्या आणि विक्रेत्यांनी बियाणे कायदा आणि बियाणे नियंत्रण आदेशांचं काटेकोर पालन करावे असे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले आहेत. ते आज पुणे कृषी महाविद्यालयात आयोजित, बियाणे उत्पादक संस्था आणि विक्रेते यांच्या खरीप हंगामपूर्व राज्यस्तरीय कार्यशाळेत बोलत होते.

या कार्यशाळेत आगामी हंगामासाठीची पूर्वतयारी, बियाण्यांचे नियोजन, उपलब्धता आणि वितरण यावर सविस्तर चर्चा झाली. यंदा संभाव्य एल निनो पार्श्वभूमीवर पाण्याचा ताण सहन करणारे आणि कमी कालावधीत वाढणारे वाण उपलब्ध करुन द्यावेत, तसंच पेरणी उशीरा झाली तर पर्यायी पीक नियोजन तयार करावे अशा सूचना यावेळी कृषी मंत्र्यांनी विभागाला दिल्या.

**<><><><><>**

गेल्या आर्थिक वर्षात मेळघाट परिसरात ९२ बालकांचा मृत्यू झाल्याची नोंद आरोग्य विभागाकडे आहे. याच काळात ५ मातांनीही जीव गमावला आहे. चिखलदरा आणि  धारणी या डोंगराळ आणि दुर्गम तालुक्यांत हा प्रश्न अधिक गंभीर आहे.  दरम्यान, धारणीमधल्या १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचं

श्रेणीवर्धन करून ३०० खाटांच्या सामान्य रुग्णालयात रूपांतरित करायला सरकारनं मान्यता दिली आहे.

<><><><><>

डेन्मार्कमध्ये हॉर्सेन्स इथं सुरू असलेल्या थॉमस-उबर चषक बॅडमिंटन स्पर्धेत भारतानं ऑस्ट्रेलियाचा ५-०नं पराभव करून उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. लक्ष्य सेननं एफ्रेम स्टीफन सॅम याचा २१-१४, २१-१६ असा पराभव केला. आयुष शेट्टीनं श्रेय धंद याला २१-८, २१-६ असं सरळ गेममध्ये हरवलं. सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारताच्या जोडीनं रिझकी हिदायत आणि जॅक यू या जोडीचा २१-१४, २१-१६ असा पराभव करत भारताची आघाडी आणखी वाढवली. तर एच.एस. प्रणॉयने, ऋषी होंडा भूपतीचा २१-११, २१-१७ असा पराभव केला. या स्पर्धेत अ गटातल्या देशांमध्ये भारत आणि चीन अव्वल स्थानावर आहेत. या गटातलं अव्वल स्थान पटकावण्यासाठी येत्या २९ एप्रिलला चीन आणि भारतात सामना होईल.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात आज ६३९ अंकाची वाढ झाली आणि तो ७७ हजार ३०४ अंकावर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजारचा निफ्टीही १९५ अंकाची वाढ नोंदवत २४ हजार ९३अंकावर बंद झाला.

<><><><><>

क्षयमुक्त भारत अभियानाच्या १०० दिवसीय विशेष उपक्रमांतर्गत धाराशिव जिल्ह्यात आरोग्य विभाग विशेष मोहिम राबवत आहे. क्षय तपासणीसाठी विशेष शिबिरांचे आयोजन, रुग्णांना पोषक आहार कीटचे वितरण असे अनेक उपक्रम विभाग राबवत आहे. आपल्या गावात क्षय तपासणी शिबिर असल्यास प्रत्येकाने आपली तपासणी करुन घ्यावी असं आवाहनही धाराशिव जिल्हा आरोग्य विभागाने जिल्ह्यातल्या नागरिकांना केलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्सचा आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात सामना होणार आहे. नवी दिल्लीत अरुण जेटली मैदानावर थोड्याच वेळात, साडे सात वाजता हा सामना सुरु होईल.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू नं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये, दक्षिण आफ्रिकेत बेनोनी इथं सुरु असलेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं भारतापुढं विजयासाठी १५६ धावांचं आव्हान ठेवलं आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेनं निर्धारित २० षटकात ६ गडी गमावून १५५ धावा केल्या.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात विदर्भात काही ठिकाणी, तर कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली.

येत्या दोन दिवसात, विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. कोकणात उष्ण आणि दमट हवामान राहण्याची, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**